Friday, November 08, 2024
8:04 PM

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०८/११/२०२४

दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र ९३८/२०२४ कलम ११८(१), ३५२ बी एन एस | वॉटर सप्लाय कॉर्टर शाम नगर अमरावती | दि.०७/११/२०२४ चे २१.०० वा<br>दि.०८/११/२०२४ चे ००.३५ वा | शुभम राजाराम झिंगळे वय २८ वर्ष रा वॉटर सप्लाय कॉर्टर शाम नगर अमरावती | मयुर राजाराम झिंगळे वय ३३ वर्ष रा वॉटर सप्लाय कॉर्टर श्याम नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नमुद घटना ता वेळी कामावरुन घरी आला असता फि चा मोठा भाऊ (आरोपी )हा टि व्ही बघत होता, आरोपी हा दारु पिण्याच्या सवईचा असुन काहीही कामधंदा करीत नाही म्हणुन फि ने त्यास म्हटले की, तु सकाळ पासुन टि व्ही बघत होता आता मला टि व्ही पाहु दे यावर आरोपीने फि सोबत वाद घालुन शिवीगाळ केली तसेच घरातील लाकडी काठी घेवुन फि चे उजव्या दंडावर मारली व होटावर बुक्की मारुन फि ला जख्मी केले अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र ९३९/२४ कलम ११८(१) बी एन एस | भोईपुरा वडाळी अमरावती | दि.०७/११/२०२४ चे १७.०० वा<br>दि.०८/११/२०२४ चे ०२.५१ वा | पवन किशोर गिरी वय २३ वर्ष रा बेलपुरा तिवारी महाराज यांचे घराजवळ अमरावती | नितीन दिनेश वानखडे वय १९ वर्ष रा भोईपुरा वडाळी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी पोलीस भरती ची तयारी करीत असुन अभ्यासाकरीता शंकर दिलीप वानखडे या मित्राकडे येणे जाणे करीत असतो शंकर च्या घराशेजारी त्याचा चुलत भाउ नितीन दिनेश वानखडे (आरोपी) हा राहत असुन १५ दिवस पुर्वी फि चे त्याच्यासोबत वाद झाले, नमुद घटना ता वेळी फि व त्याचा मित्र शंकर जेवण झाल्यावर अंगणात बोलत उभे असताना आरोपी नितीन तेथे आला व फि सोबत वाद करुन म्हणाला की, तुला सांगितले होते की माझ्या घराजवळ यायचे नाही तुझी मोटारसायकल माझ्या घरासमोर ठेवायची नाहीअसे म्हणुन घरातुन लोखंडी सत्तुर हातात आणुन फि चे कपाळावर उजवे बाजुला मारुन जख्मी केले त्यामुळे फि खाी जमिनीवर पडला, आरोपी त्याच्या घरात गेला असता फि चा मित्र शंकर, ऋत्विक पंधरे व हेमंत सरोते यांनी फि ला गाडीवर ईर्विन दवाखाना येथे इलाजाकरीता भरती केले असे फि चे बयाण वरुन व मेडीकल सर्टिफीकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

फसवणुक

| अ. क्र. | पो.ठाणे, गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ, | फिर्यादी नांव पत्ता व | आरोपीचे नांव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र ९४६/२४ कलम ३१६(२),३१८(४) बी एन एस | अमरावती | दि,०७.११.२०२४ चे ०७.०० वा<br>दा ता वेळ- दि.०८.११.२०२४ चे १३.२१ वा | एक महीला, | एक महीला आरोपी | हकीकत याप्रमाणे आहे की यातील फिर्यादीची आईची काळजी घेण्याकरिता केअर टेकर म्हणुन एक महीला हिला कामावर ठेवले असुन नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी महीला हिने फिर्यादीचे आईचे हाताला व पायाला लोशन लावुन मालिश करुन देण्याकरिता तिचे आईचे अंगावरील हातातील सोन्याच्या दोन पाटल्या ४० ग्रँम वजन किं अं ३१२००० रु ,दोन सोन्याच्या बांगड्या वजन ३० ग्रँम किं अं २३४०००/- रु, तसेच एक सोन्याचा गोफ वजन १८ ग्रँम कि अं १४०४००/-असे एकुण अंदाजे ६८६४००/- रु चे दागिणे काढुन घेवुन आरोपीने मालिश करुन दिली व त्याच सारखे दुसरे नकली दागिणे फिर्यादीचे आईचे अंगावर घातले व विश्वासघात करुन चोरुन घेवुन पसार झाली. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. |

चोरी —२

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे खोलापुरी गेट 251/2024 कलम 303(2) BNS | दत्तात्रय सराफ मयुर चौक ते जवाहर गेट अमरावती | 07/11/2024 वा 13.30 ते 14.00 सुमारास दाखल ता वेळ 08/11/2024 चे 15.33 वाजता | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी ही तिच्या आई व बहीणी सोबत खरेदी करीता शराफा मार्केट अमरावती येथे आले असता यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे आई जवळ असलेल्या पिशवी मध्ये हिरव्या रंगाची हॅन्ड बॅग होती ज्या मध्ये नगदी 7000/- SBI ATM, पॅन कार्ड इत्यादी सामान असलेली हिरव्या रंगाची हॅन्ड बॅग कोणीतरी अज्ञात चोराने पिशवी मधुन काढुन चोरुन घेवुन गेला अशा फिर्‍यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ४३७/२४ कलम ३०३(२) | बस डेपो अमरावती | गु घ. ता वेळ दि ०८/११/२४चे १३.००दि ०८/११/२४चे १५.१३ वा | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादि हे आज रोजी वडीलांचे घरी जाणे असल्याने भाच्याच्या गाडीवर बसुन १२.०० वा सुमारास एस टी डेपो येथे आली व दुपारी ०१.०० वा चे सुमारास कु-हा येथे जाणे करीता आ्रवी या बसमध्ये चढत असतांना माझे् एका हातात कपडयाची बॅग व एका हातात सोन्याची पोत असलेली गुलाबी रंगाची पर्स होती मी बस मध्ये बसल्यानंतर माझी् पर्स पाहली असता त्याची चेन उघडी दिसली पर्स मध्ये छोटे पॉकीट ज्यामध्ये पोत व ४०००/- रुपये होते दिसुन आले नाही बसमध्ये गावी जाणे करीता चढत असताना तिचे जवळ असलेल्या पर्स मधील २५ ग्रॅंम सोन्याची पोत ज्यात सोन्याचे काळे मनी ओवलेले कि अं ७०,०००/- रु नगदी ४०००/- रु असे एकुण ७४०००/- रु नमुद मुद्देवाल हा कोणीतरी अज्ञात चोराने गर्दीचा फायदा घेवुन चोरुन नेला आहे अशा फि चे जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

इतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो स्टे बडनेरा अप क्र.६९५/२४ कलम १३६ भा विका | **दाभ ाशिवार कृषी रोहित्र डी पी स्मश ान क्र ४३००३०४ बडनेरा** | **दि.०६/११/२० २४ चे १२/०० ते दि.०७/११/२० २४ चे १७/०० दाख ता वेळ- दि.०८/११/२४ चे १५/३८ वा** | **एक महीला** | अज्ञ ात | हकीकत अशाप्रकारे आहे की दि.०७/११/२४ रोजी अज्ञ ात चोरटयांनी राष्ट्रीय महामार्ग लागत असलेल्या दाभ ाशिवारातील असलेल्या कृषी रोहित्र स्मश ान डि पी रोहित्र स्मशान डि पी रोहीत्र ४३००३०४ वरील ७२० मिटर ॲल्युमिनीयम तार ५० गेजचा व ५४० मिटर न्युट्रल तार २५ गेजचा कि.अ.२६,४६०/-रुचा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेलेबाबत फिर्याद दिली आहे. अशा फिचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| १ | पो.स्टे. नांदबावपेठ अप क्र. ४१०/२४ कलम २८५ भा.न्या.स | NH ६ हायवे रहाटगाव अमरावती | ०८/११/२०२४ चे ११.०० वा ८/११/२०२४ चे | ललितकुमार कुंजाम ब.न. ४१४ नांदगाव पेठ | रंजित भिमराव मनोहरे वय ३५ रा. दिपक नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की फि.यांची पोस्टे एरीयात पेट्रोलीग ड्युटी असतांना नमुद घटना ता वेळी व ठिकाणी एक इसम त्याची हात गाडी आमरोडवर लावुन लोकांच्या जीतास धोका व सुरक्षेतेस धोका निर्माण होईल अशी लावुन त्याचे कृत्य कलम २८५ भा.न्यास प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द गुन्हा दाखल |
| १ | **पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र ९४५/२४** | **दि.०७.११. २०२४ चे २२.०० वा** | **दि.०८.११.२० २४ चे ००.३२ वा** | सरतर्फे संजय ओंकारराव वानखेडे पो उप नि | १ सादीक शाहा बिस्मिल्ला शाहा वय ४० वर्ष रा | याप्रमाणे आहे की,नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टॉप सह पेट्रोलिंग करित असतांना गुप्तबातमीदार कडुन अमलीपदार्थाची विक्री करणाऱ्या इसमाची खात्रीशीर खबर मिळाली वरुन फिर्यादी सोबत राजपत्रीत अधिकारी पो नि श्री बाबाराव अवचार साहेब गुन्हे शाखा ,दोन शासकीय पंच,फोटोग्राफर,इलेक्ट्रीक काटासह |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम २०,२२,२९ एन डी पी एस | | | नेमणुक गुन्हे शाखा युनिट २ अमरावती श | लालखडी इमाम नगर अमरावती<br>२ शेख महबुब शेख रुस्तम वय ६० वर्ष रा इतवारी बाजार पोलिस चौकी जवळ वर्धा | तसेच इतर साहित्य सिलचे साहित्यासह शासकीय वाहनाने कार्यवाही करिता एन डी पी एस कायद्या अंतर्गत दिलेल्या तरतुदीचे पालन करुन रवाना झालो खबरेप्रमाणे सापळा लावला असता दोन्ही आरोपी हे पंचवटी चौककडे येताना दिसले वरुन आम्ही त्यांना घेराव घेवुन त्याना परिचय देवुन पोनि सा यांनी त्यांना झडती घेण्याचे कारण सनजावुन सांगुन त्याचे परवानगी ने पंचासमक्ष झडती घेतली असता दोन्ही आरोपीतांचे पोटाला शर्टाचे आतील भागाला कापडी पट्टे गुंडाळुन पांढऱ्या दोरीने पक्के बांधलेले असल्याचे दिसुन आले सदर कापडी पटटे व टेप पटटीने गुंडाळलेले दोन्ही बंडल उघडुन पाहणी केली असता त्यात प्लास्टीकमध्ये उग्र वास येत असलेला ओलसर गांजा नावाचा अमली पदार्थ असल्याची खात्री झाली.दोन्ही आरोपीच्या ताब्यातुन गांजा माल दोन स्वतंत्र प्लास्टिक पोत्यामध्ये वेगळा करण्यात आला व साहित्य वेगळे करण्यात आले.मालाचे मोजमाप केले असता वर्णन पुढीलप्रमाणे<br>आ क्र १ याचे कडुन गांजा माल एक प्लास्टिक पोत्यासह एकुण वजन ४.८६५ कि ग्रॅं.रिकाम्या पोत्याचे( वजन ०.१६० ग्रॅं) कि अं ९४१०० रु.<br>आ क्र २ याचे कडुन गांजा माल एक प्लास्टिक पोत्यासह एकुण वजन ४.८७० कि ग्रॅं.रिकाम्या पोत्याचे( वजन ०.१६५ ग्रॅं) कि अं ९४१०० रु.<br>आ क्र १ व २ यांचे ताब्यातील गांजा वाहुन नेण्याकरिता वापरलेली कापडी प्लास्टिक पट्टे आणि दोरी एका प्लास्टिक पोत्यामध्ये.कि अं ००/-<br>आ क्र १ याचा जुना वापरता जिओ भारत मोबाईल सिमकार्ड सह कि अं १०००/-<br>आ क्र २ याचा सॅमसॅग कंपनीचा जुना वापरता मोबाईल सिमकार्ड सह किं अं ११०००/- रु असा २००२००/- चा माल जप्ती पंचनामा प्रमाणे पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. |

➢ प्रोव्हिशन

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | . पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर. | ९४०/२०२४ कलम ६५(ई) महा. दा. का. | अवैध दारु विक्री करणे | यशोदा नगर नं १ गल्ली नं २ राजेश तिवारी यांचे घराजवळ अमरावती | दि.०८/११/२०२४ चे ०९.४५ वा | दि.०८/११/२०२४ चे १३.२४ वा | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास ब नं १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर | रोहन नरेन्द्र बगडे वय ३० वर्ष रा यशोदा नगर नं १ अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे डी. बी. पथकात असुन पो. स्टाफसह पो.स्टे. हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीलायक माहितीवरुन दोन पंच व कर्मचारी यांचे सह आरोपी याच्यावर रेड केली असता आरोपीच्या ताब्यात अवैध रित्या देशी दारु विक्री करीत असतांना ११ नग देशी दारु पावट्या संत्रा बॉबी कंपनीच्या कि. अं. ८८०/- रु. चा प्रो. माल मिळुन आला त्याचे हे कृत्य कलम ६५(ई) महा. दा. का. प्रमाणे होते. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| १ | पोठाणे बडनेरा | अप क्र ६९४/२०२४ कलम ६५(ई) ,मदाका | **दारु विर्की करने** | मिलचाळ नवी वस्ती बडनेरा येथील आरोपी चे राहते घरी | **दि ०८/११/२०२४ चे ११/०५ वा.** | **दि ०८/११/२०२४ चे १४/०८ वा** | पो.हे.का. रोशन भीमराव भालेराव वय-४८वर्षे रा-मिलचाळ बडनेरा | **मनोज भीमराव भालेराव वय-४८वर्षे रा-मिलचाळ नवी वस्त्ी बडनेरा** | **हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना** बॉबी संत्रा देशी दारु पावटया एकुण १०नग १८० एम एल च्या एकुण कि अ.७००/-रु मुददेमालचा **मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल** |
| | नांदगाव पेठ | अप क्र. ४०९/२४ | अवैद्य दारु | ग्राम पिंपऴ विहीर | ०८/११/२४चे | ०८/११/२४ | सरतर्फे पोउपनी सुनील | निलेशा विक्की भोसले वय | हकिकत अशा प्रकारे की फि. यांची दि ०८/११/२०२४ चे ०६/०० वा प्रो करणे पेट्रोलिंग करत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की पिंपऴ विहीर येथे |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कलम ६५ (फ)(क) ,(ड) म.दा.का . | विक्री. | | ०९.४५ वा | चे १०.४ ५वा | दयारामजी खंडारे पो. स्टे. नांदगाव पेठ | २१ वर्षे रा पिंपळ विहीर ता. जि. अमरावती | निलेशा विक्की भोसले हि तिच्या घरी गा.हा.भ. दारु काढत आहेअशा खबरीवरून प्रो रेड केली असताआरोपीच्या ताब्यातुन ९० लीटर गा.हा.भ. दारु कि.अंदाजे ९०००/-रुपये असा एकुम ९००० रुपयेचा चा माल मिळुन आला.एक सिए सॅम्पल करिता १८० एम,एच.काचेच्या शिशित घेवुन बाकी माल जागेवर नष्ट करण्यात आला. वरुन फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| **१** | **पोस्टे.राजापेठ** | **अप.क्र. ६६२/२४ कलम ६५(ई)मदा.का.** | अवैद्य दारु विक्री. | **माधव नगर स्मशानभुमी जवळ आरोपीचे घरासमोर अमरावती** | **दि.८/११/२४ चे ११-३० ते १२-१० वा.दरम्यान** | **दा.ता वेळ दि. ०८/११/२४ चे १३-१५ वा** | **सरतर्फे पो.हे.कॉं.मनिष करपे बं.न.१५२० पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर** | एक महीला | **हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी पोस्टॉपसह मिळालेल्या माहीतीवरुन प्रो रेड केली असता यातिल आरोपी हिचे ताब्यातुन १३ नग देशी दारुच्या ९० एम.एल बॉबी संत्रा पावट्या प्रत्येकी ३५ असे ४५५/-रुचा प्रोव्ही माल चा माल मिळुन आल्याने सदरचा गुन्हा दाखल** |

अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना ता वेळी दाखल ता वेळ | घटनास्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नागपुरीगेट मर्ग क्र.25/2024 कलम 194 बीएनएसएस | दि. 07/11/2024 चे 15/00 वादाखल ता. वेळदि. 08/11/2024 चे 02/55 वा | ईर्वीन दवाखाना अमरावती | संजय वासुदेवरावबनकरबय 45 वर्षरा. रतनगंजमाळीपुरा अमरावती | भाष्करवासुदेवरावबनकरवय 65 वर्ष .रतनगंज माळीपुरा अमरावती | ब्रॉँडडेथ | हकीकत अशा प्रकारे आहे की पोहेका चिमोटे ईर्वीन पोलीस चौकी यांनी वायरलेस व्दारेमाहीती दिली की .रतनगंज माळीपुरा अमरावती येथ राहणारा संजय वासुदेवराव बनकर,बय45वर्ष हा ब्रॉँड डेथ झाल्याने मेमो ईर्वीन दवाखाना येथे आहे.अशा माहीती वरुन ईर्वीन दवाखाना नापोका भारत ब. न. 1435 येथे जावुन पोहेका चिमोटे यांना भेटुन मरणा चा मेमो क्र1226 हा प्राप्त करुन त्यांच्या नातेवाईकांना भेटुन त्यांना विचारपुस करुन सदर मर्ग दाखल करुन तपासात घेतला |